# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- ६०-२३** **दिनांक :- २०/०२/२०२३**

## अग्निशस्त्र विक्री करण्यासाठी आलेल्या आरोपीतास अटक करुन एक गावठी कट्टा व २ जिवंत काडतुस हस्तगत - तुळींज पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

दिनांक १९/२/२०२३ रोजी तुळींज पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एक इसम तुळींज स्मशानभुमीजवळ नालासोपारा पुर्व येथे अग्निशस्त्र विक्री करण्याकरीता येणार आहे. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने तुळीज पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शैलेंद्र नगरकर यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहा.पोलीस निरिक्षक श्री.एम.डी.म्हात्रे यांना सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी नालासोपारा पुर्व, तुळींज स्मशान भुमीजवळ सापळा कारवाई करुन आरोपीत नामे जियालाल विजयराज जयस्वाल यास एक गावठी कटटा व ०२ काडतुसे असा एकुण ११,०००/- रुपये किंमतीच्या मुददेमालासह ताब्यात घेतले. नमुद आरोपी याने विनापरवाना स्वत:च्या कब्जात अग्निशस्त्र व दोन जिवंत काडतुसे बाळगल्याने तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र. I १४०/२०२३ भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ (१) (अ) सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २ वसई तथा अति. कार्यभार परिमंडळ ३, श्री. चंद्रकांत जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली तुळींज पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.शैलेंद्र नगरकर, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे स.पो.नि. श्री. एम.डी.म्हात्रे, पो.उप.निरी. बाळासाहेब बांदल, सहा.पो.उप.निरी. शिवानंद सुतनासे, पो.हवा. आनंद मोरे, उमेश वरठा, आशपाक जमादार, पांडुरंग केंद्रे, पो.अंम. छपरीबन, यांनी केली आहे.




**------000------**